**प्रतिवादीतर्फे सा.क्र. १ चा सरतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. के. आर. घाडगे यांच्यामार्फत शपथेवर सुरू-:-**

१. माझे शपथपत्र नि.क्र. ९८ मधील संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे व तो वाचून दाखवल्यावर मी त्यावर निशाणी अंगठा केला आहे.

सरतपास पुर्ण.

**उलटतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री. एन. जी. तनपुरे यांच्यामार्फत :-**

२. गट क्र. ५१/२/२ हा आमचा असून आम्ही स्वत: ती जमीन कसतो. तर मयत वादी गोविंद यांचा गट क्र. ५१/१ असा आहे. वादी व आमच्या जमिनीत दक्षिणोत्तर सामाईक बांध आहे. सदर बांधावर लिंबाची झाडे आहेत. वादीच्या जमिनीच्या पश्चिम दिशेला शिंगणापूर रस्ता गेलेला आहे. सदर शिंगणापूर रस्त्याच्या पुर्व बाजुला गट क्र. ५१/१ मध्ये वादीची वस्ती आहे. गट क्र. ५१/२/२ मध्ये ७/१२ नुसार आमची ७० गुंठे जमीन आहे.

प्रश्न - गट क्र. ५१/१ मध्ये वादी यांची ७/१२ नुसार ६६ गुंठे जमीन आहे ?

उत्तर - आमची २३ गुंठे वादीच्या नावावर आहे.

वादीच्या गट क्र. ५१/१ मध्ये विहीर आहे. सदर विहीर आमची सामाईक असून मी त्यातुन पाणी घेते. आमच्या गट क्र. ५१/२ च्या दक्षिण दिशेला काळे यांची जमीन आहे. तसेच वादी यांच्या जमिनीशेजारीही काळे यांची जमीन आहे. वादी व काळे यांच्या जमिनीत बांध आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर जमिनीच्या बांधावर नारळाची झाडे आहेत. साक्षीदार स्वत:हू सांगते की, सदर नारळाची झाडे जमिनीत आहे. आम्ही आमच्या क्षेत्रातील ३५ गुंठे जमीन एकनाथ म्हसे यांना विकली आहे.

प्रश्न - न्यायालयाचा मनाई हुकूम असतानाही तुम्ही वादग्रस्त मिळकत वादीला करू देत नाही ?

उत्तर - सदर जमीन आमची मालकी हक्काची आहे.

प्रश्न - वादीच्या जमिनीतील २३ गुंठे जमीन तुमच्या मालकी हक्काची असल्याबाबत काही पुरावा दाखल केला आहे काय ?

उत्तर - त्याबद्दल मी सांगु शकत नाही.

३. हे म्हणणे खरे नाही की, वादीची २३ गुंठे आम्हाला बळकावयाची असल्यामुळे आम्ही त्यांना त्रास देतो. आमच्यात व वादीत वाटण्या झाल्या आहेत. मी वादी व त्यांच्या मुलांविरूध्द मला मारहाण केल्याबद्दल फौजदारी केस दाखल केली होती. सदर फौजदारी प्रकरण हे राहुरी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात सुरू होते. सदर प्रकरणाच्या निकालाबद्दल मला कल्पना नाही. वादग्रस्त जमिनीच्या मोजणीच्या वेळेस आम्हाला माहीत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, दि. १५/११/२०११ रोजी आम्ही वादी व आमच्या जमिनीतील सामाईक बांध फोडला. हे म्हणणे खरे नाही की, मोजणी नकाशातील काटवण क्षेत्र आमच्या मालकिचे नाही. हे म्हणणे खरे नाही की, मोजणीच्या वेळेस मी हजर होते व मी मोजणीदाराला हाताशी धरून माझ्या सांगण्याप्रमाणे मोजणी नकाशा करून घेतला. हे म्हणणे खरे नाही की, वादीची जमीन बळकावण्यासाठी मी खोटे शपथपत्र दाखल करून आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

DISTRICT COURTS MAHARASHTRA
MAYUR EKNATHRAO PAWAR
Digitally signed by MAYUR EKNATHRAO PAWAR
Date: 2026.01.21 13:27:53 +0530

(मयुर ए. पवार)

दिनांक:-२१/०१/२०२६.

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
ता. राहुरी, जि. अहमदनगर.